**श्री. अरुण साधू यांना 'अंतराळ'कडून भावपूर्ण श्रद्धांजली!**



ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार श्री. अरुण साधू यांचं २५ सप्टेंबर रोजी निधन झालं. अतिशय गाजलेला चित्रपट, 'सिंहासन' हा त्यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' ह्या दोन कादंबऱ्यांतील निवडक प्रसंगांवर आधारित होता. २००८ साली 'सांगली' येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. साहित्य अकादमी पुरस्कार, भारतीय भाषा परिषद पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

जन्मः १७ जून १९४१
मृत्यू: २५ सप्टेंबर २०१७